उपक्रमाच्या पहिल्या वर्षी निवडलेल्या ३३ मुलांना विविध पद्धतीने लिंगभाव, लैंगिकता, हक्क, समानता, आरोग्य, हिंसा व पुरुषत्व या मुद्द्यांवर संवेदनशील बनवून आपापल्या महाविद्यालयातील इतर समवयस्क मुलांशी संवाद साधण्याचे दीर्घ प्रशिक्षण देण्यात आले.

हरीश सदानी

# चाकोरी मोडून काढणारे तरुण पुरुष

'स्त्रियांवरील हिंसाचार वाढतो आहे. आपल्या विभागात मुलींवरील सामूहिक बलात्काराच्या घटना वारंवार घडताहेत व यात भाग घेणारे ऐन विशीतील मुलगे आहेत. स्त्रियांसाठी सुरक्षित व आश्वासक वातावरण अजूनही नाही आणि त्याला जबाबदार आपल्या समाजातील पुरुषी अहंकार आहे. पण सारेच पुरुष यात दोषी नाहीत. तरीही हिंसाचाराच्या छोट्यामोठ्या घटना आपल्या आसपास घडत असताना आपण पुरुषांनी त्या मूग गिळून पाहत बसणं यात मर्दानगी नाही. बिघडलेली ही परिस्थिती आता आपण पुरुष बदलवू शकतो. आपण आपल्याप्रमाणेच इतरांना संवेदनशील बनवू शकतो.' पुणे जिल्ह्यातील सासवडच्या एसटी स्टँडमध्ये मेगाफोन हातात घेऊन अमोल काळे, गणेश फुले व इतर कॉलेजात शिकणारे तरुण आवाहन करत होते.

'एकविसाव्या शतकात आजही स्त्रियांना असमानतेची वागणूक दिली जाते. घरापासून याची सुरुवात होताना दिसते. मुलाला घराबाहेर मैदानी खेळ खेळायला परवानगी दिली जाते. पण मुलींना घरातच खेळायला सांगितले जाते, असे का? मुलांच्या हॉस्टेलमध्ये त्यांना रात्री साडेदहापर्यंत हॉस्टेलबाहेर फिरण्याची मुभा असते, पण मुलींचे हॉस्टेलचे गेट रात्री आठ वाजेपर्यंतच उघडे असल्याचे दिसून येते. हा भेदभाव का?' आपल्या महाविद्यालयातील सूचना फलकावर लावलेल्या विचाराक्षरी या भित्तीपत्रकात आपले मनोगत साताऱ्यातील इम्रान मणेर या तरुणाने मांडले होते.

'अगदी काही महिन्यापूर्वीपर्यंत मला फक्त पुरुष मित्रच होते. गटात मुली असणं म्हणजे आपला कमीपणा असे मला वाटायचे. मुलींशी माझा संबंध फक्त जेव्हा त्या बाजूने जात असताना मी शिट्या वाजवायचो वा शेरेबाजी करायचो एवढ्यापुरताच. पण लोणावळ्यातील एका शिबिरात आल्यानंतर मला जाणवू लागले की मी मुलींशी किती वाईट वागत होतो. आता मी मुलींना चिकणी, आयटम असं बोलत नाही.' सोलापूरहून मुंबईतील सिद्धार्थ महाविद्यालयात शिकायला आलेला अक्षय जाधव युवकांच्या एका गटचर्चेत मोकळेपणाने सांगत होता.

अमोल, गणेश, इम्रान, अक्षय हे विशीतील तरुण आहेत मेन अगेन्स्ट व्हायलन्स अँड अब्युज (मावा) संस्थेने गेली चार वर्षे पुणे, मुंबई, सातारा, कोल्हापूर येथे चालवलेल्या आगळ्या उपक्रमातील युवा संवादक. आज असे शंभरएक संवादक आपल्या विभागात, राज्यात इतरत्रही समवयस्क मुलांशी व वस्ती समुदायातील इतर तरुण पुरुषांशी स्त्रीपुरुष नातेसंबंध, लैंगिकता, आरोग्य, हिंसा, पुरुषत्व व संबंधित मुद्द्यांवर, नावीन्यपूर्ण माध्यमांचा वापर करीत एक सशक्त संवादाची प्रक्रिया चालवत आहेत. एका सशक्त समाजनिर्मितीचे स्वप्न घेऊन




अधिकाधिक युवकांपर्यंत पोहोचण्यासाठी धडपडत आहेत.

देशात स्त्रीविरोधी लिंगाधारित हिंसेचा प्रश्न हाताळण्यासाठी होत असलेल्या अनेक वर्षांच्या प्रयत्नांत स्त्रीसक्षमीकरण व त्याद्वारे त्यांनी आपले स्वत्व ठासून सिद्ध करणे यावर लक्ष केंद्रित केले गेले आहे. या प्रयत्नांत परिवर्तनाच्या प्रक्रियेपासून पुरुष अलिप्त, दूरच असलेले दिसतात. पुरुषत्वाची पारंपरिक चौकट मोडल्याशिवाय खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता, स्त्रीसक्षमीकरण शक्य आहे का? ही चौकट मोडायची असेल, पुरुषांचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायचा असेल तर स्त्रियांवरील हिंसा, गैरवर्तन व संबंधित प्रश्नांना केवळ ते स्त्रियांचे प्रश्न म्हणून न पाहता ते तितकेच पुरुषांचेही प्रश्न आहेत असं मानून पुरुषांनाही या प्रश्नांचे निवारण करणारा महत्त्वपूर्ण घटक म्हणून सहभागी करण्यासाठी अनेक पातळींवर जेव्हा प्रयत्न होतील, तेव्हा प्रश्नांच्या मुळावर काम होईल व स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत ईप्सित असलेला महत्त्वाचा बदल होताना दिसेल.

ही भूमिका व विचारसरणी अंगीकारत मावा संस्था गेली अठरा वर्षे काम करत आहे. सप्टे. १९९१ मध्ये, 'असे पुरुष हवे आहेत की जे मानतात स्त्रियांना मारहाण करणे चुकीचे आहे. तुम्ही जर स्त्रियांवरील हिंसा थांबवण्यासाठी इच्छुक पुरुष असाल तर आपल्या नाव-पत्ता-दूरध्वनी क्रमांकसह येथे लिहा...' या इंडियन एक्स्प्रेस, लोकसत्ता,



जनसत्ता वृत्तपत्रात प्रकाशित आवाहनास मी व इतर २०४ पुरुषांनी दिलेल्या प्रतिसादातून मावा संस्थेचा जन्म झाला. विविध क्षेत्रातील, वयोगटातील संवेदनशील पुरुषांनी स्थापन केलेली देशातील ही आगळी संस्था विविध सांस्कृतिक अवकाशांचा वापर करून, अनेक अभिनव कृती-कार्यक्रम व युवा शिक्षणाद्वारे पुरुषांची चळवळ उभी करण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे.

गेली अठरा वर्षे स्त्री-पुरुष नातेसंबंध, लैंगिक आरोग्य, हिंसा या मुद्द्यांवर पुरुषांसाठी कार्यशाळा, संवादसत्रं सातत्याने आयोजित करून, अनुभवी समुपदेशकांद्वारे गरजू स्त्री-पुरुषांना वैवाहिक कलहाच्या प्रश्नांवर मार्गदर्शन करीत, कौटुंबिक हिंसाचार, स्त्रीलिंगी गर्भपात, लैंगिकता शिक्षण इत्यादी विषयांवर व्यापक जनजागृतीपर मोहिमा घेत, 'पुरुषस्पंदनं', 'माणूसपणाच्या वाटेवरची' या वैशिष्ट्यपूर्ण दिवाळी अंकाद्वारे तमाम पुरुषांना अवकाश देऊन स्त्री-पुरुष समतेच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

मावाच्या या आगळ्या कामाला गती मिळाली ती ऑगस्ट २००६ पासून सुरु झालेल्या युवा मैत्री या अभिनव उपक्रमाने.

**मावाच्या या आगळ्या कामाला गती मिळाली ती ऑगस्ट २००६ पासून सुरु झालेल्या युवा मैत्री या अभिनव उपक्रमाने.**

**काय होता हा उपक्रम-** पुणे जिल्ह्यातील जेजुरीचं आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान संचालित कलामहाविद्यालय, सासवडचं वाघिरे महाविद्यालय, हडपसरचं अण्णासाहेब मगर महाविद्यालय, नारायणगावचं ग्रामोन्नती मंडळ संचालित महाविद्यालय, मंचरमधील अण्णासाहेब आवटे महाविद्यालय आणि पुणे शहरातील हिरभाई देसाई महाविद्यालय या ६ महाविद्यालयांत हा उपक्रम राबविण्यात आला. प्रामुख्याने प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमात शिकणारी, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) वा संबंधित उपक्रमात सक्रिय असलेली १८-१९ वर्षे वयोगटातील ३३ मुलगे या सहा महाविद्यालयांतून निवडण्यात आले. बहुसंख्य मुले ही निम्नमध्यम वर्गातील होती.

उपक्रमाच्या पहिल्या वर्षी निवडलेल्या ३३ मुलांना विविध पद्धतीने लिंगभाव, लैंगिकता, हक्क, समानता, आरोग्य, हिंसा व पुरुषत्व या मुद्द्यांवर संवेदनशील बनवून आपापल्या महाविद्यालयातील इतर समवयस्क मुलांशी (मुलगे) संवाद साधण्याचे दीर्घ प्रशिक्षण देण्यात आले. ७-८ दिवसांची निवासी कार्यशाळा, युवा मेळावे, ग्रामीण शिबिरे , प्रकल्प-भेट आयोजित करून गटचर्चा, पथनाट्य, लघुपट, चित्रकथा, गाणी, खेळ, प्रश्नपेटी, भित्तीपत्रकं यांचा प्रभावीरित्या वापर करून विद्यार्थी संवादकांना प्रशिक्षित केले गेले. राजू इनामदार, मिलिंद चव्हाण व प्रशांत केळकर या तडफदार कार्यकर्त्यांबरोबर ज्येष्ठ लैंगिकतातज्ज्ञ डॉ. अनंत व शांता साठे, स्त्रीवादी कार्यकर्त्या मनीषा गुप्ते, नाटककार अतुल पेठे, आरोग्यभान चळवळ चालवणारे डॉ. मोहन देशपांडे या सर्वांनी उपक्रमाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर मुलांना प्रशिक्षण देऊन प्रेरित व प्रोत्साहित केले.

युवा मैत्री उपक्रमाच्या दुसऱ्या वर्षी,१७ प्रशिक्षित विद्यार्थी संवादक आपापल्या महाविद्यालयातील स्वयंसेवी विद्यार्थ्यांशी स्त्री-पुरुषांमधील निकोप नातेसंबंध, पुरुषत्व, लैंगिक आरोग्य व संबंधित मुद्द्यांवर संवाद साधू लागली. इच्छुक विद्यार्थ्यांच्या गटांसाठी नियमितपणे सत्रं, विविध माध्यमांचा (उपक्रमाच्या पहिल्या वर्षी शिकलेल्या) वापर करून आयोजित करू लागली. मुलींची घटती संख्या, लैंगिक शिक्षणावर शाळांमध्ये बंदी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या व इतर विषयांवर मासिक भित्तीपत्रके तयार करून, ती महाविद्यालयातील सूचनाफलकांवर लावून व त्यांवर उत्स्फूर्त चर्चा घडवून त्यांनी संवादाची प्रक्रिया चालू ठेवली. युवा मैत्री मेळावे घेऊन जिल्ह्यात स्त्रियांवरील हिंसाचार व लैंगिक अत्याचारांचा जाहिर निषेध करणारे कार्यक्रम आयोजित करून, पंढरपूरच्या वारकऱ्यांसाठी व वारीनिमित्त जमलेल्या विद्यार्थी-समुदायांमध्ये त्यांनी स्त्रीजाणीवविषयक संवेदनशीलता निर्माण करून असंख्य युवकांशी सुसंवाद साधला.

सहभागी विद्यार्थ्यांसाठी सत्रे घेत असताना संवादकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. कधी महाविद्यालयातील इमारतीत दुरुस्तीचे काम सुरु असल्यामुळे रिकाम्या वर्गखोल्या मिळत नसत, कधी सत्रांच्या वेळा अभ्यासाचे अतिरिक्त तास वा विद्यापीठाने निर्देशित केलेले कौशल्य वर्ग घेतले जात होते. जागेची अडचण संवादक महाविद्यालयातील मैदानात, कॅन्टिनमध्ये वा सार्वजनिक उद्यानात सत्रे घेऊन सोडवत असत.

उपक्रमाच्या पहिल्या वर्षी सहभागी प्रत्येक विद्यार्थी प्रशिक्षकास वैयक्तिक बदल नियोजन करण्यास सांगण्यात आले होते. पुरुषप्रधान व्यवस्थेतून पुरुष म्हणून मिळणारे विशेषाधिकार व त्याचबरोबर व्यवस्थेतून येणाऱ्या मर्यादा याविषयीची मांडणी करून विशेषाधिकाराचा वापर करून व्यक्तिगत आयुष्यातील स्त्रियांमध्ये (उदा. आई, बहीण, वहिनी) समानता आणण्याबाबत प्रयत्न करण्यास त्यांना

प्रोत्साहित करण्यात आले.

व्यक्तिगत बदल नियोजन करून अनेक संवादक आपापल्या घरातील स्त्रियांना वेळोवेळी महत्त्वाचे निर्णय घेण्यास प्रेरित करू लागले. मनोरंजन वा इतर गोष्टींसाठी बहिणीला घराबाहेर पाठवून ते घरकामात सक्रियपणे सहभागी झाले. लैंगिकता व इतर मुद्द्यांवर (मुलींची छेडछाड, रक्तात हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होऊन स्त्रियांना होणारा ॲनिमिया / रक्तपांढरी ते मासिक पाळीशी संबंधित सर्व बाबी) मोकळेपणाने घरातील व्यक्तींशी, मित्रमैत्रिणींशी ते बोलू लागले.

मुलींबद्दल अचकट विचकट बोलणे, त्यांना टाइमपास मानणे, मुलींना कशाही पद्धतीने जिंकणे, पुरुष असल्यामुळे आपल्या कुठल्याही गोष्टीला स्त्रीचा नकार म्हणजे आपल्या पुरुषार्थाचा अपमान, स्त्रीची इच्छा नसली तरी आपली इच्छा पूर्ण झालीच पाहिजे, स्त्रीच्या नकारातच तिचा होकार असतो... असे स्त्रियांना दुखावणारे पुरुषार्थाचे अर्थ आज समाजात दिसतात. अशा स्थितीत पुरुषार्थाची व्याख्या बदलण्यासाठी स्वतःपासून सुरुवात करणारे हे संवादक देशातील एका आगळ्या, पथदर्शी प्रयोगाचे शिल्पकार सिद्ध होऊ लागले.

चाकोरी मोडून काढणाऱ्या या विशीतील संवादकांची प्रक्रिया जवळून पाहणाऱ्या पुणे जिल्ह्यातील अनेक स्वयंसेवी संस्था, स्त्री संघटना, शाळा- महाविद्यालय पुरुषांच्या अनेक गटांशी संवाद साधण्यासाठी त्यांना निमंत्रित करू लागले- अनेक उपक्रम त्यांच्याशी संघटितपणे घेऊ लागले. 'स्त्री मुक्ती संघटना' ही संस्था शालेय मुलांसाठी सुरू केलेल्या जिज्ञासा प्रकल्पांतर्गत गटचर्चा आयोजित करण्यासाठी युवा मैत्री संवादकांना बोलावू लागली. राज्य साधन केंद्राने एचआयव्ही / एड्सविषयी पथनाट्याचे प्रयोग जिल्ह्यातील गावागावांत समुदायासाठी सादर करायला निमंत्रित केले. ब्रेकथ्रू टीव्ही या दिल्लीतील संस्थेने कौटुंबिक हिंसाचार थांबवण्यासाठी सुरू केलेल्या 'बेल बजाओ' या अभिनव उपक्रमासाठी व्हिडिओ व्हॅनच्या माध्यमातून औरंगाबाद व नाशिक जिल्ह्यातील अनेक दूरच्या गावात जाऊन स्थानिक रहिवाशांशी संवाद साधण्यासाठी युवा मैत्री संवादकांना बोलावून घेतले. मासूम, तथापि व इतर स्त्री संघटना त्यांच्याबरोबर परिसंवाद, रॅली, स्त्री हिंसाचारविरोधात निषेध कार्यक्रम घेऊ लागल्या.

२००८ साली युवा मैत्रीच्या धर्तीवर युवा संवाद हा उपक्रम मुंबईतील ५ महाविद्यालयांत सुरू झाला. गुरुनानक कॉलेज, सिद्धार्थ महाविद्यालय, डॉ. टी. के. टोपे महाविद्यालय, कीर्ती महाविद्यालय व रुपारेल महाविद्यालयात नवीन विद्यार्थी संवादकांची फळी हळूहळू तयार होऊ लागली.

जून २००९ मध्ये साताऱ्यातील श्रमिक जनता विकास संस्था या जावळी तालुक्यात १८ वर्षे ग्रामीण विभागात काम करणाऱ्या संस्थेबरोबर संयुक्तपणे 'मावा'ने 'मानुष' हा प्रकल्प सुरू केला. १७-१८ वर्षे वयोगटातील महाविद्यालयात शिकणाऱ्या व इतर तरुणांबरोबर स्त्री-पुरुष समानता, लैंगिकता, एचआयव्ही / एड्स व संबंधित मुद्द्यांवर काम करण्यासाठी आज संवादक तयार होऊ लागले आहेत.

कोल्हापूरच्या डी. के. शिंदे स्कूल ऑफ सोशल वर्कच्या समाजकार्य अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना जून २००९ पासून 'मानुष' प्रकल्पात सामावून घेत युवक संवाद केंद्र व अनेक विधायक उपक्रम सुरू झाले.

'युवा मैत्री' उपक्रमात सहभागी होणाऱ्या पुणे जिल्ह्यातील खानवडी गावातील (महात्मा फुलेंचे हे जन्मगाव) गणेश फुले हा संवादक आज पुण्यातच नव्हे तर राज्यात इतरत्र आपल्या चमूसोबत संवाद-सत्र, प्रशिक्षण कार्यक्रम मोठ्या आत्मविश्वासाने, चिकाटीने व जिद्दीने घेत आहे. त्याच्याइतकेच तडफदारपणे अमोल काळे व सुनिल चाचर हे संवादक पुरुषत्वाच्या साचेबद्ध संकल्पांना प्रश्न विचारून माणूसपणाची वाट चोखाळण्यासाठी अनेक युवकांना प्रेरित करीत आहेत. सुनिलने तर मानस एकात्मिक सामाजिक संस्था जून २010 मध्ये स्थापन करून स्त्री सबलीकरणाच्या अनेक मुद्द्यांवर स्वतःच्या गावात अनेक उपक्रम घ्यायला सुरुवात केली.

मानसशास्त्राची पदवी घेऊन सध्या त्याच विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या मुंबईतील मीत शिंदे या तरुणाने युवा मैत्री हेल्पलाइन ( ०२२- २६८२६०६२) सुरू करून गरजू युवक-युवतींना त्यांचे प्रश्न बिनधास्तपणे मांडून मोकळे होण्यासाठी अवकाश दिले आहे.

पुरुषाच्या हिंसक वर्तणुकीच्या मुळाशी असलेल्या प्रश्नांविषयी आत्तापर्यंत राज्यातील २५000हून जास्त युवकांपर्यंत पोहोचून लिंगसमतावादी पुरुषत्त्वाच्या सकारात्मक पर्यायांना माझे शंभरएक संवादक चालना देत आहेत. परिवर्तनाच्या प्रक्रियेत पुरुष प्रवर्तक कसे होऊ शकतात याचा आदर्श या संवादकांनी निर्माण केला आहे.



एका दुर्लक्षित पण महत्त्वाच्या मुद्द्यावर मी सातत्याने केलेल्या कामाची दखल अलीकडे अशोका चेंजमेकर्स (अमेरिका) व महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कारानिमित्त घेतली गेली आहे, याचा आनंद आहेच. पण ज्या प्रश्नांवर १८ वर्षांपूर्वी मी व माझ्या मोजक्या साथीदारांनी कामाला सुरुवात केली होती, त्या प्रश्नांना आपले मानून आज विशीतील असंख्य तरुण ते प्रश्न हाताळत आहेत. याचे समाधान शब्दात व्यक्त करण्यापलीकडे आहे.

✉ harsh267@rediffmail.com

**१७-१८ वर्षे वयोगटातील महाविद्यालयात शिकणाऱ्या व इतर तरुणांबरोबर स्त्री-पुरुष समानता, लैंगिकता, एचआयव्ही / एड्स व संबंधित मुद्द्यांवर काम करण्यासाठी आज संवादक तयार होऊ लागले.**